**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

प्रति,
मा.प्राचार्य,
सर्व संलग्न विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय / महोदया,

जात वैधता प्रमाणपत्राअभावी ज्या विधी/शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रवेशित उमेदवारांचे नामांकन, प्रवेश पत्र/निकाल रोखले असतील ते जारी करण्याबाबतचे सहाय्यक परीक्षा समन्वयक, राज्य सामाईक परीक्षा कक्ष, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचे जा.क्र.रासाप्रपक/जात वैधता प्रमाणपत्र/२०१६-१७/८५७/२०१७, दि.२२/०८/२०१७ चे पत्र आपल्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित केले आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

आदेशान्वये,

I/C उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ 86
दि.: 6 SEP 2017

प्रत - परीक्षा विभाग, माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

# महाराष्ट्र शासन
## राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष

मुख्य कार्यालय, ३०५, शासकीय तंत्र निकेतन इमारत, ८९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग,वांद्रा (पूर्व), मुंबई- ४०० ०५१
वेबसाईट:www.mahacet.org ईमेल: maharashtra.cetcell@gmail.com
दूरध्वनी:०२२ - २६४७३३१९

जा.क्र.रासाप्रपक/जात वैधता प्रमाणपत्र/२०१६-१७/८५७/२०१७ दि.२२/०८/२०१७

प्रति,
कुलसचिव,
महाराष्ट्रातील सर्व अकृषि विद्यापीठे,

विषय:एल.एल.बी ३ वर्ष व ५ वर्ष, बी.एड., बी.पी.एड., एम.एड., एम.पी.एड.,२०१६-१७ मध्ये प्रवेशित मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बाबत.

संदर्भ: १)प्राचार्य, मौलाना अबुल कलम आझाद मराठी बी.एड., कॉलेज यांचे पत्र क्रमांक 655 A/2017/date 8/6/2017.
२)प्राचार्य, डॉ.पंजाबराव देशमुख कॉलेज ऑफ लॉ यांचे पत्र क्रमांक PDCL/969/2017/date 02/08/2017
३)प्रस्तुत कक्षाचे पत्र क्रमांक रासाप्रपक/मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या जात वैधता/६२५/२०१७ दि. ०३/०७/२०१७

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित विषयास अनुसरुन एल.एल.बी ३ वर्ष व ५ वर्ष बी.एड., एम.एड, एम.पी.एड, बी.पी.एड. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये केंद्रिय प्रवेश प्रकियेतील प्रवेशित झालेल्या व महाविद्यालयाने उमेदवारांच्या प्रमाणपत्राची छाननी करुन तयार केलेल्या प्रवेशित उमेदवारांची अंतिम यादी मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी तपासून दिलेली आहे. सदर यादी मध्ये काही मागासवर्गीय उमेदवारांच्या नावा समोर जात वैधता प्रमाणपत्र प्रलंबित असा शेरा शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी नियुक्त केलेल्या केंद्रिय तपासणी समितीने नोंदविला आहे.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने सर्व महाविद्यालयांना मागासवर्गीय उमेदवाराकडे वैधता प्रमाणपत्र नसल्यास त्यांच्याकडून 'एच' नमुन्यात प्रतिज्ञा पत्र घेण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार सर्व विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालयांनी प्रतिज्ञापत्र घेऊन त्यांच्या दप्तरी ठेवले आहेत.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाने विशेष पत्राव्दारे विनंती करुन सुध्दा समाजकल्याण विभाग व आदिवासी विकास विभाग यांनी एल.एल.बी ३ वर्ष व ५ वर्ष, बी.एड., एम.एड., एम.पी.एड., बी.पी.एड., अभ्यासक्रमाचा समावेश व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या यादीत अदयापी न केल्याने, मागासवर्गीय उमेदवांराना जात वैधता प्रमाण पत्रासाठी अर्ज करण्यात अडचणी येत आहेत. ही बाब लक्षात घेऊन जात वैधता प्रमाणपत्र अभावी ज्या विधी/शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रवेशित उमेदवांराचे नामांकन, प्रवेश पत्र/निकाल रोखले असतील ते कृपया जारी करावे अशी आपणास पुनश्च विनंती आहे.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष मुंबई

सहाय्यक परीक्षा समन्वयक
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,मुंबई

स्थळप्रत: मा.आयुक्त राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचे कडून स्वांक्षाकित

**प्रत माहितीस्तव व उचित कार्यवाही स्तव:**
१)कुलसचिव, महाराष्ट्रातील सर्व अकृषी विदयापीठे
२)मा.संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१
३) मा.अप्पर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीस्तव सादर.

Shivaji University, Kolhapur
Affiliation I-2
Inward No. 1669
Date 24/08/17